REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 7 | APRIL - 2019

# सोलापूर जिल्ह्यातील लोककला




डॉ. तानाजी अंबादास देशमुख
मराठी विभागप्रमुख, वसुंधरा कला महाविद्यालय,
जुळे सोलापूर.

## प्रस्तावना

सोलापूर जिल्ह्याचे बहुभाषिकता व बहुसांस्कृतिकता हे वैशिष्टये आहे. गिरणगाव म्हणून प्रसिध्द असलेल्या या जिल्ह्यात अनेक पोटसंस्कृती आहेत. लोकजीवनात विविधता असल्याने लोकसाहित्य व लोककलांचा समृध्द वारसा या जिल्ह्याला लाभला आहे. लोकरंजन व लोकप्रबोधनाचे माध्यम असलेली सोलापूर जिल्ह्यातील लोककला काळाबरोबर बदलाच्या नव्या वाटा शोधीत जनमानसात आपले स्थान टिकवून आहे. या जिल्ह्यात गोंधळ, जागरण, पोतराज, वासुदेव, धनगराची गाणी, बहुरुपी, शाहिरी, लावणी, पिंगळा, बंजारा, भारुड, कीर्तन आणि भजन अशा लोककला आढळतात. या लोककलांचा संक्षिप्त आढावा घेण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात घेतला आहे.

## गोंधळ

गोंधळ घालण्याची परंपरा कुलाचार, कुलधर्म म्हणून सोलापूर जिल्ह्याच्या सर्व भागात आढळते. धार्मिक विधी , लग्न, मुंज इ. समारंभात गोंधळ घालण्याची प्रथा आहे. घरातील विवाहादी मंगलकार्ये निर्विघ्नपणे पार पाडल्याबद्दल गोंधळाच्या माध्यमातून देवीची स्तुती आणि उपासना केली जाते. गोंधळ ही लोककला भूतमातेशी संबंधीत असून, प्रयोगरुप कलाप्रकाराची परंपरा आहे. ही परंपरा सातव्या शतकापासून चालत आलेली आहे. तुळजापूर आणि माहूर ही त्यांची मूलस्थाने आहेत. सोलापूर जिल्ह्यात राहूल भंडारी, दत्तात्रय तुकाराम वायकर, सुभाष गोरे हे प्रसिध्द गोंधळी आहेत.

## जागरण

जागरण हे खंडोबाचे विधिनाटय वाघ्या व मुरळया सादर करतात. लग्न, मुंजी या संस्कारानंतर कुलाचार म्हणून जागरण केले जाते. हा उपासनाविधी असून प्रतिकात्मक स्वरुपात पाच ऊसाचे मखर करुन वाघ्या-मुरळयांचा समूह तुणतुणे, टाळ, घाटी, डफ इत्यादी वाद्यांच्या साथीने देवाची गाणी म्हणतो. जागरण सादर करतांना पाच पावली, कोटंबा पूजन, घटस्थापना, लंगरतोड, तळी भरणे हे विधी होतात. जागरण या लोककलावंताची संख्या सोलापूर जिल्ह्यात खूप असून खंडू बलभिम शिंदे पिरळे), दगडू कृष्णा शिंदे (पानिव),पांडुरंग सुर्यभान उघाडे (उडगी), आनंद महादेव घोगरे (चपळगांव), दादा रावबा अवघडे( मंगळवेढा) असे नामांकित लोककलावंत आहेत.

## पोतराज

सोलापूर जिल्हयात विविध देवीच्या यात्रा भरतात. त्यामुळे पोतराज संख्या मोठया प्रमाणावर आहे. तुळजाई, चिवरीची आई, लक्ष्मी दहिवडी, , कमलादेवी (करमाळा) माढेश्वरी (माढा) , अकलाई देवी (अकलूज) इत्यादी देवी आहेत. म्हणून महाराष्ट्रात जास्तीत जास्त देवीची सेवा करणारे उपासक म्हणून पोतराज आहेत. प्रत्येक गावाच्या शिवेवर मरिआई देऊळ आहे. कोणत्याही रोगाचे संकट किंवा अरिष्ट येवू नये , म्हणून देवीचा गाडा सन्मानाने पुढे घेऊन जावा लागतो. त्यामध्ये पोतराजाची महत्त्वाची भूमिका असते. सोलापूर जिल्ह्यात भाऊराव लकप्पा कांबळे(चपळगांव) दशरथ पांडुरंग अवघडे ( मंगळवेढा) कोंडिबा कोकरे (ब्रह्मपूरी ) इत्यादी नामांकित पोतराज आहेत.

## वासुदेव :-

स्वत:च्या अंगावर श्रीकृष्णासारखा पोशाख करुन भल्या पहाटे एक किंवा दोन वासुदेव घरोघरी जाऊन शुभसंदेश देतो. जेणेकरुन आपल्या दारी शुभशकुनाचा आणि अतिमहत्त्वाचा व इप्सीत साध्य होणारा दिवस जाणार अशा पध्दतीने लोकांना त्याच्याविषयी भावना निर्माण झालेली असते. वासुदेव लयबध्द अशा पध्दतीने गाणी म्हणतो. आयाबाया सूपातून त्याला दान देतात. 'दान पावलं, दान पावलं' असा जयघोष करुन आनंदी मनाने तो पुढे चालत राहतो. चार-पाच वासुदेव एकत्र येऊन एखादी कथा (आख्यान) संवादरुपातून गुंफत असतात. वासुदेव ही लोकसंस्कृती टिकवून ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य करतात. प्राचीन काळापासून ही परंपरा चालत आलेली आहे. सोलापूर जिल्हयात खेडयापाडयातही आज वासुदेव आढळतात. वासुदेव हे पौराणिक व सामाजिक आशयाची कलात्मक गीते सादर करतात. आध्यात्माचे महत्त्व पटवून देतात. तीर्थक्षेत्र, धार्मिक स्थळे इत्यादी विषयाची सश्रध्द भावना वाढीस लागावी आणि घराघरात , गावागावात शांतता व बरकत लाभावी म्हणून उत्तम संदेश देण्याचे काम वासुदेव करतात आणि त्यांच्याकडून शुभशकुन अशा वार्ता मिळतात. पंढरपूर येथे वासुदेवांची सख्या अधिक आहे.

## धनगराची गाणी :-

धनगरी ओव्या व धनगरांचे गजीढोल ही एक वैशिष्टयपूर्ण लोककला सांगोला, मंगळवेढा, माळशिरस या परिसरात आहे. धनगरांचे कुलदैवत बिरोबा हे आहे. बिरोबाचे महात्म्य सांगणा-या अनेक कथा त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. धनगरांच्यामध्ये 'सुंबरान' आणि 'हुईक' असे दोन उपासनाविधी आहेत. धनगर समाजामध्ये गजीढोल हे परंपरेने चालत आलेले लोकनृत्य आहे. हा सामूहिक नृत्याचा प्रकार असून त्यात फक्त पुरुष सहभागी होतात. गजीढोल नृत्यात ढोल, झ ांजा, कांड, सूर अशी वाद्ये असतात. 'अडिपांग ऽ डिपांग ' असे साधारण ढोलाचे बोल असतात. ढोलाच्या तालावर पाउंड धरला जातो. प्रारंभी 'कात्रा' होतो. पुढे 'घाय' धरली जाते. मल्लघाई, करबलघाई, टाळीची घाई, लंगडीची घाई, हुरडयाची घाई असे काही घायांचे प्रकार आहेत. सोलापूर जिल्ह्यात तुकाराम शिवाजी मेटकरी ( ओझेवाडी ) हे नामांकित लोककलावंत आहेत.

## बहुरुपी

महाराष्ट्रातील लोकप्रिय विनोदी कलाप्रकार म्हणून बहुरुपी ओळखला जातो. या कलाप्रकाराचा मुख्य उद्देश म्हणजे रंजन आणि उद्‌बोधन करणे. बहुरुपी हा विविध रुप धारण करणारा एक उत्तम नट( अभिनेता) होय. इतरांची हुबेहुब चालण्याची व बोलण्याची किंवा एखाद्या महत्त्वाच्या पदाची नक्कल करणे , यामध्ये त्याचे उत्तम कौशल्य असते. बहुरुप्याला वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया नावांने ओळखतात. सोलापूरात 'रायरंद' या नावानं त्यास ओळखतात.

सोलापूर शहरात स्वतंत्र बहुरुपी नगर असून , या नगरात बहुरुपी हे कलावंत आजही आपली कला सादर करुनच उरदनिर्वाह करतांना दिसतात.

## शाहिरी

सोलापूरात नागेश ( मोहोळ) श्री सिध्देश्वर ( माचणूर) श्री सिध्दरामेश्वर ( सोलापूर ) श्री संतनाथ ( वैराग) येथील जत्रांच्या माध्यमातून भेदिक शाहीर आपल्या रचना सादर करतात. त्यांच्यामध्ये 'कलगी' आणि 'तुरा' असे दोन भेद आहेत. भेदिकाच्या फडात या दोघांचिही आमने सामने जुगलबंदी पहावयास मिळते. भेदिकाचा फड हे प्रयोगरुप स्वरुपात आहेत. मराठी शाहिरीचा प्रारंभ सोलापूर जिल्ह्यात नागेश संप्रदायातील कवी अज्ञानसिध्द, मन्मथ स्वामी, बहिरा पिसा यांनी केला. ही परंपरा आजअखेर सोलापूर जिल्ह्यात अखंडपणे सूरु आहे.कलगी तु-याच्या शाहिरीचे फड गोवोगावी होतात. आपल्या शाहिरीतून मनोरंजनाबरोबरच आध्यात्म, तत्त्वज्ञान आणि भक्ती यांचा ते प्रसार करीत असतात.

सतराव्या शतकात संत मानकोजी बोधले यांचे शिष्य जोतीराम (धामणगाव), अनंत रामचंद्र बडवे (पंढरपूर), शिवजगन्नाथ(करमाळा), जीवमुक्त(करकंब), शाहीर धोंडी (सोलापूर) वगैरेनी जिवंत ठेवली. सोलापूरचे शाहीर अमर शेख, शाहीर जगन्नाथ शिराळ, बीरप्पा कामूर्ती, शिनूतात्या काडगांवकर, शाहीर रामसिंग , शाहीर दिवाकर इत्यादींनी समाजप्रबोधन केले. कवी कुंजविहारी, कवी सजीव, रा ना.पवार यांनी शाहिरीत भर टाकली. शाहीर अमर शेख आणि संजीव यांच्या प्रेरणेने शाहीर विश्वासराव फाटे, शाहीर अजीज नदाफ यांनी सामाजिक , राजकीय पश्नांवर प्रकाश टाकला. थोडक्यात मनोरंजनातून समाजप्रबोधन केले आहे. सोलापूर जिल्ह्यात आजही साखरे धोंडीराम दादा( डोंगरगांव ), यशवंत नामदेव कसबे( रड्डे ) जगन्नाथ दगडू डोके(माचणूर) आण्णासो पांडुरंग गांडुळे ( रांझणी ) राजेंद्र कांबळे ( माळेवाडी ) नवनाथ धोत्रे (नरखेड) इत्यादी शाहीर आहेत.

## लावणी

पंढरपूरच्या उत्पातांची बैठकीची लावणी सर्वत्र प्रसिध्द आहे. शृंगार आणि भक्ती यांचा सुरेख संगम असलेल्या या लावणीचा प्रसार बाळकोबा उत्पात, दादोबा उत्पात, ज्ञानेश्वर व मच्छिंद्र उत्पात आणि पिलोबा ऐतवाडकर यांनी केला. या लावणीत गण, गौळण, चारचौकी लावणी, छक्कड हे प्रकार आढळतात. सत्यभामाबाई, छबू-गजरा, छाया-प्रभा पंढरपूरकर या गायिकांनाही उत्पातांनी लावणी गायनाचे शिक्षण दिले. या बरोबरच तमाशामधील पारंपरिक शृंगारप्रधान लावण्या सादर करणारे कलावंतही सोलापूर जिल्ह्यात आहेत.

## पिंगळा

पिंगळे ही भिक्षेक-यांची एक जमात आहे. यांची वस्ती सोलापूर जिल्हयात आहे. हे लोक पिंगळा नावाच्या पक्ष्याच्या साहायाने भविष्य कथन करतात. म्हणून त्यांना पिंगळा हे नाव मिळाले असावे.पुरुष जातीतील लहान मुले कमरेला व डोक्याला वस्त्रे गुंडाळतात, अंगात लांब अंगरखा व जाकीट घालतात आणि त्यावर एक उपरणे घेतात. हे कपडेही त्यांनी भिक्षा मागूनच मिळविलेली असतात. रस्त्याच्या कडेला बसून अथवा दारोदार हिंडून हे भिक्षा मागतात व भविष्य सांगतात.तसेच लोकवस्तीतील एखाद्या झाडावर बसून सर्वांचे शुभशकुन सांगतो

## बंजारा

बंजारा ही महाराष्ट्रात आढळणारी एक जात आहे. सोलापूर जिल्हयात फटातेवाडी, प्रतापनगर तांडा,घोडा तांडा, करुल तांडा इ. ठिकाणी यांचे वास्तव आहे. या लोकांना वंजारी, बंजारी, बनजारा, बिंजारी, लमाण, लंबाडा , लंबाडोडू, इ. अनेक नांवे आहेत. आपसांत बोलतांना हे स्वत:ला 'गोर' म्हणून संबोधतात. शंकर , तुळजाभवानी व बालाजी ही बंजारांची कुलदैवते होत. यांशिवाय ते राम, मारुती, अंबाबाई, मरीअम्मा, महाकाली, सती, शीतलादेवी, कालिका, असावरी, बंजारीदेवी सेवाभाया व मिठुभुकिया या दैवतांनाही भजतात. बंजारा लोकांना नृत्य व संगीत यांची फार आवड असते. नगारानृत्य, साप व मोर यांची नृत्ये, दोन्ही हातांचे नृत्य, एक टागेरो, उडारा, इ. त्यांची नृत्ये प्रसिध्द आहेत. होळी हा बंजारा समाजाचा सर्वात महत्त्वाचा सण पारंपरिक पध्दतीने साजरा केला जातो.

## भारुड

सोलापूर जिल्ह्यामध्ये भारुडाची लोककला काही कलावंतांनी मोठया निष्ठेने जतन केली आहे. भारुड हा लोककला प्रकार विविधता, नाटयात्मता, विनोद आणि गेयता या चार कारणांमुळे लोकप्रिय आहेत. भारुड सादर करतांना त्यांतील पात्रांची सोंगे आणली जातात आणि प्रसंगानुरुप बतावणी करण्यात येते. करमणुकीबरोबरच आध्यात्मिक उपदेश व लोकशिक्षण देण्याचे कार्य भारुडांनी केले आहे. म्हणूनच संत एकनाथांची भारुडे लोककलावंतांच्या कंठात असून ती कमालीची लोकप्रिय आहेत. सोलापूर जिल्ह्यात भारुड सादर करणाऱ्या लोककलांवतांची संख्या अधिक आहे. पुरुषांबराबर स्त्री कलावंत आहेत. सौ . चंदाताई तिवाडी यां १९८२ पासून भारुडाच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे कार्य करीत आहेत. संध्या गोपाळ साखी ( पंढरपूर ) , वामनराव गोपाळ शिंदे ( रांझणी ), किसन मारुती शिंदे ( आंबे ) रावसाहेब पाटील ( तावशी ) सिताबाई जावीर ( चळे ) इत्यादी.

## कीर्तन

वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत विठोबा व तीर्थक्षेत्र पंढरपूर हे सोलापूर जिल्ह्यात असल्याने कीर्तन ही सोलापूरातील महत्त्वाची व प्रसिध्द लोककला आहे. गायन, वादन, वक्तृत्व, नृत्य, नाटय, विनोद या सा-यांचा एकत्रित संगम झालेल्या कीर्तनाने लोकरंजनाबरोबरच लोकशिक्षण करण्याचे कार्य केले आहे. पंढरपुरात एकादशीनिमित्त व एरवीही अखंड कीर्तने होत असतात. सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात धार्मिक कार्यक्रमाच्या निमित्ताने कीर्तन व प्रवचनाचे आयोजन केले जाते.

## भजन

सोलापूर जिल्ह्यात पंढरपूर संतांची मांदीयाळी असल्याने या परिसरात भजन परंपरा आहेत. या मध्ये स्त्री-पुरुष ही भजन गातात. त्या निमित्ताने नृत्य करतात. भजनी पुरुष व महिलाही नृत्य करतात. त्याला पावूल असे म्हणतात. रात्रीच्या वेळी भजन करतांना पुरुष सोंगे ही आणतात. त्यानिमित्ताने मनोरंजन केले जाते. ही परंपरा आजही खूप मोठया प्रमाणात सोलापूर जिल्ह्यात पाहवयास मिळते.

## समारोप

सोलापूर जिल्ह्यातील लोककला व लोकसंस्कृतीची समृध्द परंपरा आहे. सोलापूर शहरातील बहुसांस्कृतिकता मोठी वैशिष्ट्यपूर्ण आहे. अनेक छोटया छोटया जातीजमाती(वैदू, कैकाडी, लोदी, कुंचीकोरवी) असून त्यांच्या त्यांच्या स्वतंत्र लोककला आहेत. या लोककलांचे शास्त्रीय पध्दतीने अभ्यास, संशोधन होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच लोककलावंतांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करुन त्यांना पुरेसे आर्थिक स्थैय मिळवण्यासाठी शासकीय व सामाजिक पातळीवर काम होण्याची गरज आहे.

## संदर्भ ग्रंथ


१. खांडगे, प्रकाश -महाराष्ट्राच्या प्रयोगात्म लोककला परंपरा आणि नवता, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
२. ढेरे, रा. चि.- लोकसंस्कृतीचे उपासक, पद्मगंगा प्रकाशन, पुणे,
३. मांडे, प्रभाकर- लोकरंगभूमी, गोदावरी प्रकाशन, औरगांबाद.


LBP PUBLICATION